SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004, MAHARASHTRA
PHONE : EPABX – 2609000 PGBUTR-0231 2609296/9139,
www.unishivaji.ac.in, pgbutr@gmail.com
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४,
महाराष्ट्र
दूरध्वनी - ईपीएबीएक्स - २६०९००० दूरध्वनी पी.जी.बी.यु.टी.आर.- ०२३१ २६०९२९६/९१३९, www.unishivaji.aic.in, pgbutr@gmail.com

Estd. 1962
"A++" Accredited by NAAC(2021) With CGPA 3.52

संदर्भ क्र. शिवाजी विद्यापीठ/पीजी.बीयुटीआर/पीएच.डी/ 7348 दि. 12 SEP 2025

**अत्यंत महत्वाचे/तातडीचे**

१. प्रति,
मा. प्राचार्य/मा.संचालक,
संलग्नित महाविद्यालये,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

२. प्रति,
मा. अधिविभागप्रमुख/संचालक/केंद्रप्रमुख
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

विषय - पीएच.डी. संशोधक विद्यार्थ्यांच्या थेसिस तपासणीस अनुसरून मान्यताप्राप्त संशोधन मार्गदर्शकांनी संबंधीत रेफरीकडून थेसिस तपासून घेण्याबाबतचीअनुषंगिक कार्यवाही करणेबाबत.

**महोदय/महोदया,**

उपरोक्त विषयानुसार आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, विद्यापीठातील विविध अधिविभाग व विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या महाविद्यालये/संस्थामध्ये पीएच.डी. करीता प्रवेशित झालेल्या संशोधक विद्यार्थ्यांचे प्रशासकीय कामकाज संगणक प्रणालीव्दारे (Software) मधून सुरू आहे. त्यानुसार पीएच.डी. संशोधक विद्यार्थ्यांचा अंतिम शोधप्रबंध (Hard Bound Thesis) जमा होतात तदनंतर या विभागाकडून त्याच्याशी निगडीत सर्व प्रशासकीय कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर तो थेसिस संगणकप्रणालीव्दारे संबंधीत रेफरींच्या लॉगिनमध्ये तपासणीसाठी पाठविला जातो. त्यांनतर संबंधीत विद्यार्थ्यांचा थेसिस तपासणीसाठी कोणत्या रेफरींकडे गेला आहे याची माहिती संबंधीत संशोधन मार्गदर्शक यांना त्यांच्या Login मध्ये दिसते. तथापि, पीएच.डी. संशोधक विद्यार्थ्यांचा थेसिस संबंधीत रेफरीकडे गेल्यानंतर बऱ्याच महिन्यांनी त्याची तपासणी होत असल्याचे निदर्शनास येत आहे. तर काहीवेळा ४ प्राधान्यक्रमांपैकी २ ते ३ रेफरींकडून थेसिस नाकारला (Reject) होत असल्याचे दिसून येत आहे. अशावेळेस थेसिसची पुर्नबांधणी/निष्फळ होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

तेंव्हा, या कार्यवाहीस अनुसरून सर्व मान्यताप्राप्त संशोधन मार्गदर्शकांना सूचित करण्यात येते की, आपल्या मार्गदर्शनाखाली संशोधन करत असलेल्या पीएच.डी संशोधक विद्यार्थ्यांचा थेसिस संबंधीत रेफरीकडे तपासणीसाठी गेल्यानंतर त्यांनी त्यांच्या Login मधून (Within Maharashtra & Out of Maharashtra) रेफरींशी भ्रमणध्वनीव्दारे सुसंवाद साधुन शक्य तितक्या लवकर थेसिस तपासणीचा अहवाल प्राप्त करून घेण्याबाबत विद्यापीठ प्रशासनास सहकार्य करावयाचे आहे. जेणेकरून संशोधक विद्यार्थ्यांच्या थेसिस पॅनलच्या प्राधान्यक्रमास बाधा येणार नाही. सदरचे पत्र आपल्या अधिविभागातील/महाविद्यालयातील मान्यताप्रापत संशोधन मार्गदर्शकांच्या निदर्शनास आणून दयावे.

कळावे,

आदेशान्वये
आपला विश्वासू
(श्री. विलास एस.सोयम)
उपकुलसचिव